Vol 5 Issue 10 Nov 2015

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

## Welcome to ISRJ

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.



## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 3.1560(UIF)
Volume - 5 | Issue - 10 | Nov - 2015

# स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना अंतर्गत लाभान्वित स्वयंसहाय्यता गटातील महिलांच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन विशेष संदर्भ : गडचिरोली जिल्हा (महाराष्ट्र राज्य)

महेंद्रकुमार मेश्राम
ऑरेंज सिटी समाजकार्य महाविद्यालय, नागपूर .


महेंद्रकुमार मेश्राम

**सारांश :**

स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत लाभान्वित स्वयंसहाय्यता गटातील महत्तम महिला बी.पी.एल. अर्थात दारिद्रय रेषेखालील (Below Povety Line) असून शेती, मोलमजुरी, शेतमजुरी, अकृषी उद्योग, कंत्राटी शेती, गृहिणी व बेरोजगार अशा उतरत्या क्रमाने महिलांची व्यावसायिक पार्श्वभूमी दिसून येते. स्वयंसहाय्यता गटात सहभागापूर्वी ७४७७ टक्के महिलांना महिन्यातून अर्धे दिवसच रोजगार उपलब्ध होत होता. स्वयंसहाय्यता गटात सहभागानंतर त्यात वाढ होऊन ६४.६ टक्के महिलांना पंधरा दिवसापेक्षा अधिक रोजगार उपलब्ध होऊ लागल्याचे व त्यातील ४१ टक्के महिलांना २० ते २४ दिवस रोजगार उपलब्ध झाल्याचे दिसून आले. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत लाभान्वित स्वयंसहाय्यता गटातील ६०.२ टक्के महिलांच्या उत्पन्नात दुप्पट वाढ असून ६.८ टक्के महिलांच्या उत्पन्नात तिप्पट वाढ झाल्याचे दिसून आले. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना ही दारिद्रय निर्मूलनाची योजना, स्वयं सहाय्यता गट केंद्रीभूत घटक मानून त्या माध्यमातून राबविल्यानेच, स्वयंसहाय्यता गटास दिलेले खेळते भांडवल, महिलांनी अंतर्गत कर्ज व्यवहारातून कार्यान्वित केलेले आर्थिक उपक्रम आणि स्वयंसहाय्यता गटाचे समूह व्यवसाय, यामुळे महिलांच्या उत्पन्नात अपेक्षीत वाढ झाली असून, हे योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीचे, महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचे आणि योजनेच्या यशस्वीतेचे अत्यंत महत्वाचे निर्देशक आहे.




**प्रस्तावना :**

केवळ भारतीय उपखंड जरी विचारात घेतले तरी महिलांच्या सामाजिक वा कौटुंबिक स्थानात जमीन. आस्मानाएवढा फरक आढळतो. सांस्कृतिक परंपरा, कुटुंब.रचना, जात.पंथ, वारसा हक्क अशा अनेक गोष्टींमुळे हा फरक पडतो. महिलांवर होणाऱ्या सामाजिक संस्कारामुळे त्या कायमच कन्या, पत्नी किंवा आई अशा नात्यांमुळे येणाऱ्या जबाबदाऱ्या पार पाडत आल्या आहेत. या जबाबदाऱ्या पार पाडण्यातच त्यांचे सारे आयुष्य खर्च होताना दिसते. हया जबाबदाऱ्या सांभाळल्यामुळे खरे तर समाजात सौख्य नांदते, तरीही या जबाबदाऱ्या पार पाडल्यामुळे त्या काहीतरी करत आहेत, असे कुणालाच म्हणजे त्यांना स्वतःला आणि त्यांच्या घरच्यांनाही कधीच वाटत नाही. त्यामुळे त्या परिस्थितीच्या गुलाम होऊन जातात. परिस्थितीने गांजलेल्या या महिलांमध्ये अनेकदा स्वतःचे प्रश्न सोडविण्याची ताकद असूनही पुरेसा आत्मविश्वास नसल्यामुळे किंवा संधी न मिळाल्यामुळे इतरांवर अवलंबून रहावे लागते. त्यांना त्यांच्याच क्षमतांची कल्पना नसते. त्यामुळे त्या सामाजिक रूढींना बळी पडतात. याचा परिणाम म्हणून त्यांना कायमच समाजात व कुटुंबात दुय्यम दर्जाची वागणूक मिळते. त्यांची ओळखही कोणाची तरी मुलगी, कोणाची तरी पत्नी किंवा कोणाची तरी आई अशी करून दिली जाते. त्यामुळे त्यांचे स्वतःचे अस्तित्वच 'कोणामुळे तरी' आहे अशी भावना मनामध्ये रूजते.

स्त्रीच्या कामाचा फार मोठा भाग नजरेआडच राहतो. ग्रामीण महिला जे घरकाम करतात, गोठयात काम करतात, शेतातील कामात नवऱ्याला मदत करतात, सरपण आणि पाणी आणण्याची कामे करतात, त्याची कुठेच नोंदच होत नाही. याला घरकामातील तिचा वाटा समजला जातो आणि त्याबद्दल कोणत्याही उत्पन्नावर तिचा

काहीही अधिकार समजला किंवा मान्य केला जात नाही. शेती व्यवसायात सुमारे ७५ टक्के तर बिगर शेती व्यवसायात ३८ टक्के महिला बिगारी मजूर म्हणून रोजंदारीवर काम करतात. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर सुमारे ७५ टक्के महिला असंघटित क्षेत्रात काम करतात. त्यामुळे श्रमप्रधान क्षेत्रांत त्यांना कमी मोबदल्यावर अधिक काळ काम करावे लागते.

महिलांच्या रोजगारामध्ये बिगरशेती विभागात छोटया प्रमाणात भाजीपाल्यासारखे दुकान किंवा पापड.लोणचंसारख्या वस्तूंची निर्मिती, अशा स्वयंरोजगारांचा तसेच विडया वळणे, बांगडया बनविणे, बांधकामावर मजुरी करणे, कारखान्यात जुळणी विभागात, पॅकिंग विभागात काम करणे, कपडयांच्या कारखान्यात शिलाई काम करणे, कागदी पिशव्या बनविणे, अशा कामांचा समावेश असतो, हे सर्व व्यवसाय अत्यंत छोटया प्रमाणावर असल्याने अशा महिलांना किमान वेतन, बाळंतपणाची रजा, पाळणाघर अशा सुविधांपासून वंचित ठेवणे मालकांना शक्य असते. शिवाय महिलांच्या रोजगाराचा दरही पुरूषांपेक्षा कमी असतो. याशिवाय तिला कामाचे शोषक स्वरूप, लैंगिक छळ, कामाचे असुविधापूर्ण वातावरण अशा गोर्ष्टीनाही तोंड द्यावे लागते. ही गोष्टसुध्दा येथे नमूद करायला हवी की, बाहेर तिच्या कामाचे स्वरूप काहीही असले तरी, अथवा ती समाजाच्या कोणत्याही स्तरातील असली तरी, घरकाम हीसुध्दा तिचीच जबाबदारी असते. या दुहेरी जबाबदारीचा परिणाम म्हणून मिळवत्या महिलांचे आयुष्य ताण.तणावग्रस्त बनलेले आहे. प्रस्तुत अध्ययनात स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत लाभान्वित स्वयंसहाय्यता गटातील महिलांच्या आर्थिक स्थितीचे वर्णन करण्यात आले आहे.

### *संशोधन समस्या :*

भारतीय संविधानाने निर्देशीत केल्याप्रमाणे कल्याणकारी राज्याची संकल्पना साकार होण्यासाठी केंद्र व राज्य शासनातर्फे भारतातील दारिद्रय निर्मूलन व्हावे, दुर्बल घटकांचा विकास व्हावा, सक्षमीकरण व्हावे यासाठी वेगवेगळया विकास योजनांद्वारे प्रयत्न करण्यात आले आहे. भारतीय प्रजासत्ताकाला ६३ वर्षे पूर्ण होऊनही आजही ग्रामीण भागातील लोकांचा पाहिजे त्या प्रमाणात विकास झाल्याचे दिसून येत नाही. या योजना अपयशी का झाल्या याची कारणमीमांसा विविध शास्त्रज्ञांनी केली असता लाभार्थ्यांच्या गरजा लक्षात न घेता ठरविलेले लक्ष्य, लोकसहभागाचा अभाव, तुटपुंजे खेळते भांडवल, मदतीचा अभाव व मार्गदर्शनाचा अभाव, महिलांसाठी विशेष भूमिका नसणे, आर्थिक व सामाजिक सेवांचा संगम न होणे ही अपयशाची प्रमुख कारणे दिसून आलेली आहेत.

तथापि, उक्त सर्व कारणांचे व अडचणींचे निराकरण व्हावे व प्रत्यक्षात आर्थिक आणि सामाजिक विकास होऊन महिला सक्षमीकरण व्हावे, दारिद्रय निर्मूलन घडून यावे यासाठी स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना अंमलात आणण्यात आली. अनेक योजनांचे एकात्मिकरण करून नव्याने तयार केलेल्या स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेची अंमलबजावणी एप्रिल १९९९ पासुन करण्यात आली. महाराष्ट्र राज्यातील गडचिरोली या आदिवासी बहुल जिल्हयात स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेची अंमलबजावणी केल्यानंतर योजनेअंतर्गत लाभान्वित स्वयंसहाय्यता गटातील महिलांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीत झालेले परिवर्तन अभ्यासण्यासाठी प्रस्तुत अध्ययन ''स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना अंतर्गत लाभान्वित स्वयंसहाय्यता गटातील गटातील महिलांच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन'' या शिर्षकाखाली करण्यात आले.

### *अध्ययनाचे उद्देश :*

•स्वयंसहाय्यता गटात सहभागापूर्वी आणि सहभागानंतरच्या महिलांच्या रोजगाराच्या स्थितीचा आढावा घेणे.
•स्वयंसहाय्यता गटात सहभागापूर्वी आणि सहभागानंतरच्या महिलांच्या उत्पन्नाच्या स्थितीचे अध्ययन करणे.

### *अध्ययन पध्दती :*

सदर अध्ययनासाठी सन २००८ ते २०११ या कालावधीत स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत गडचिरोली जिल्हयात लाभान्वित करण्यात आलेल्या ३६२ स्वयंसहाय्यता गटांपैकी ११० स्वयंसहाय्यता गटातील (एका गटातील ५ महिला) ५५० महिलांची लॉटरी तंत्राने उत्तरदाता म्हणून निवड करण्यात करून मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने तथ्य संकलन करण्यात आले. विषयाच्या संदर्भात महत्वाची व समर्पक तथ्ये शोधून काढण्यात आली व संख्याशास्त्रीय पद्धतीतील तथ्य निवेदन प्रक्रियेच्या माध्यमातून तथ्यांचे सांख्यिकीय विश्लेषण करण्यात आले.

### *स्वयंसहाय्यता गटात सहभागापूर्वी आणि सहभागानंतरची महिलांची रोजगाराची स्थिती*

श्रमाचे मोबदल्यात काही तरी मिळविणे जेनेकरून त्याच्या माध्यमातून त्याची व कुटुंबाची उपजिवीका चालेल हा त्याचा रोजगारामागील हेतू असतो. ग्रामीण भागात असलेली रोजगाराची दयनीय स्थिती सर्वश्रूत आहेच. त्याच थेट परिणाम दारिद्रय आणि अर्थव्यवस्थेवर होतो. ग्रामीण भागातील लोकांची आर्थिक व सामाजिक स्थिती त्यांना प्रत्यक्ष किती दिवस रोजगार उपलब्ध होतो यावर अवलंबून असते. प्रस्तुत अध्ययनात, स्वयंसहाय्यता गटात सहभागी होण्यापूर्वी महिलांना प्रत्यक्ष किती दिवस रोजगार उपलब्ध होता व स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत लाभान्वित स्वयंसहाय्यता गटात सहभागी झाल्यामुळे गटातील सहभागानंतर त्यांना प्रत्यक्ष किती दिवस रोजगार मिळाला याचे वर्णन खालील सारणीच्या माध्यमातून करण्यात आले आहे.

**सारणी क्र. 1**
**महिलांची रोजगाराची स्थिती**

| अ.क्र. | रोजगाराची स्थिती | स्वयंसहाय्यता गटात सहभागी होण्यापूर्वी | | स्वयंसहाय्यता गटात सहभागी झाल्यानंतर | |
|---|---|---|---|---|---|
| | | वारंवारिता | टक्केवारी | वारंवारिता | टक्केवारी |
| **1.** | 08 ते 12 दिवस | 154 | 28.0 | 008 | 01.4 |
| **2.** | 12 ते 16 दिवस | 257 | 46.7 | 022 | 04.0 |
| **3.** | 16 ते 20 दिवस | 119 | 21.6 | 133 | 24.2 |
| **4.** | 20 ते 24 दिवस | 019 | 03.5 | 225 | 41.0 |
| **5.** | 24 ते 28 दिवस | 001 | 00.2 | 162 | 29.4 |
| एकूण | | **550** | **100.0** | **550** | **100.0** |

वरील सारणी वरून असे दिसून येते की, एकूण ५५० उत्तरदात्यांपैकी ४६.७ टक्के महिलांना स्वयंसहाय्यता गटात सहभागी होण्यापूर्वी १२ ते १६ दिवस रोजगार उपलब्ध होत होता तर २४ ते २८ दिवस रोजगार उपलब्ध असलेल्या महिलांचे प्रमाण फक्त ०.२ टक्के होते. त्याचप्रमाणे, महिन्यातील फक्त ८ ते १२ दिवस रोजगार उपलब्ध होत असलेल्या महिलांचे प्रमाण २८ टक्के होते. अध्ययनातील २१º६ टक्के महिलांना महिन्यातून १६ ते २० दिवस रोजगार उपलब्ध व्हायचा तर २० ते २४ दिवस रोजगार उपलब्ध असणाऱ्या महिलांचे प्रमाण फक्त २.५ टक्के असल्याचे निदर्शनास आले. यावरून, अध्ययनातील अधिकतम म्हणजे ४६.७ टक्के महिलांना स्वयंसहाय्यता गटात सहभागी होण्यापूर्वी १२ ते १६ दिवस रोजगार उपलब्ध होत असल्याचे स्पष्ट होते.


स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत लाभान्वित झालेल्या स्वयंसहाय्यता गटातील महिलांची गटाची सहभागानंतरची रोजगाराची स्थिती लक्षात घेतल्यास एकूण ५५० महिलांपैकी ४१ टक्के महिलांना २० ते २४ दिवस रोजगार उपलब्ध झाल्याचे दिसून आले. महिन्यातून फक्त ८ ते १२ दिवसच रोजगार उपलब्ध झालेल्या महिलांचे प्रमाण केवळ १.४ टक्के असून २६.४ टक्के महिलांना २४ ते २८ दिवस रोजगार उपलब्ध झाल्याचे निदर्शनास आले. तर, १६ ते २० दिवस रोजगार उपलब्ध असणाऱ्या महिलांचे प्रमाण २४.२ टक्के असून फक्त ४ टक्के महिलांना १२ ते १६ दिवस रोजगार उपलब्ध झाल्याचे आढळून आले. यावरून, स्वयंसहाय्यता गटात सहभागी अधिकतम म्हणजे ४१ टक्के महिलांना गटात सहभागी झाल्यानंतर २० ते २४ दिवस रोजगार उपलब्ध होऊ लागल्याचे स्पष्टपणे निदर्शनास आले.

गडचिरोली जिल्हयातील स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत लाभान्वित स्वयंसहाय्यता गटातील महिलांची गटात सहभागी होण्यापूर्वीची रोजगाराची स्थिती आणि गटातील सहभागानंतरची रोजगाराची स्थिती याची तुलनात्मक मीमांसा केली असता असे दिसून येते की, महिन्यातून फक्त ८ ते १२ दिवसच रोजगार उपलब्ध असणाऱ्या २८ टक्के महिलांपैकी फक्त १.४ टक्के महिलांच्या स्थितीत काहीच बदल झाला नसल्या तरी त्यापैकी उर्वरीत २६.६ टक्के महिलांच्या रोजगारात वाढ झाली असून त्यातील ४ टक्के महिलांना स्वयंसहाय्यता गटातील सहभागानंतर १२ ते १६ दिवस रोजगार उपलब्ध झाल्याचे दिसून आले. तर, उर्वरीत २२. ६ टक्के महिला तसेच स्वयंसहाय्यता गटात सहभागी होण्यापूर्वी १२ ते १६ दिवस रोजगार उपलब्ध असलेल्या ४६.७ टक्के महिला आणि १६ ते २० दिवस रोजगार उपलब्ध असलेल्या २१º६ टक्के महिला, अशा एकूण ६०º६ टक्के महिलांपैकी २४.२ टक्के महिलांना १६ ते २० दिवस रोजगार उपलब्ध झाल्याचे स्पष्ट होते. उर्वरीत ६६.७ टक्के महिलांपैकी व गटात सहभागी होण्यापूर्वी महिन्यातून २० ते २४ दिवस रोजगार उपलब्ध व्हावयचा अशा ३º५ टक्के महिला, अशा एकुण ७०º२ टक्के महिलांपैकी ३.५ टक्के महिलांची स्थिती पूर्वीप्रमाणेच २० ते २४ दिवस रोजगाराची होती. स्वयंसहाय्यता गटात सहभागापूर्वी २० ते २४ दिवस रोजगार उपलब्ध होत होता अशा ३.५ टक्के महिलांसह उर्वरीत ३७.५ टक्के महिला, अशा एकूण ४१ टक्के महिलांना स्वयंसहाय्यता गटात सहभागानंतर २० ते २४ दिवस रोजगार उपलब्ध होऊ लागल्याचे आढळून आले. उर्वरीत २६.२ टक्के महिला आणि स्वयंसहाय्यता गटात सहभागापूर्वी २४ ते २८ दिवस रोजगार उपलब्ध असलेल्या ०.२ टक्के महिला, अशा एकूण २९º४ टक्के महिलांना स्वयंसहाय्यता गटात सहभागानंतर २४ ते २८ दिवस रोजगार उपलब्ध झाल्याचे स्पष्ट झाले.

### स्वयंसहाय्यता गटात सहभागापूर्वीचे आणि सहभागानंतरचे महिलांचे मासिक उत्पन्न

स्वयंसहाय्यता गट हे महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचे महत्वपूर्ण माध्यम आहे. स्वयंसहाय्यता गटात मासिक बचतीच्या रूपाने आर्थिक व्यवहार करणाऱ्या महिला अंतर्गत कर्जव्यवहारातून कर्ज घेऊन किंवा गटाच्या समूह व्यवसायात सहभागी होऊन उत्पन्न वाढीचे उपक्रम हाती घेतात आणि आपल्या आर्थिक स्थितीत सुधारणा करण्यासाठी निरंतर श्रम वेचतात. प्रस्तुत अध्ययनाच्या अनुषंगाने स्वयंसहाय्यता गटात सहभागापूर्वी महिलांचे उत्पन्न किती होते आणि गटात सहभागी झाल्यानंतरचे महिलांचे मासिक उत्पन्न किती वाढले यांचे वर्णन खालील आलेखात केले आहे.

आलेख क्र. 1




स्वयंसहाय्यता गटात सहभागापूर्वीचे मासिक उत्पन्न लक्षात घेतल्यास, एकूण ५५० उत्तरदात्यांपैकी महत्तम उत्तरदात्यांचे मासिक उत्पन्न १००१ ते २००० रू. असल्याचे दिसून आले. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत लाभान्वित होण्यापूर्वी ७०.२ टक्के महिलांचे उत्पन्न १००१ ते २००० रू. होते, ५.८ टक्के महिलांचे उत्पन्न ३००१ ते ४००० रू. होते तर २००१ ते ३००० रू. उत्पन्न असणाऱ्या महिलांचे प्रमाण २४ टक्के असल्याचे निदर्शनास आले. वर्ष १९९९ मध्ये स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना कार्यान्वित करतांना मासिक उत्पन्न २००० रू. किंवा त्यापेक्षा कमी उत्पन्न असणारा व्यक्ति हा गरीब किंवा दारिद्रय रेषेखालील समजला जात होता. स्वयंसहाय्यता गटातील ७०.२ टक्के महिलांचे गटात सहभागापूर्वीचे मासिक उत्पन्न २००० रू. पेक्षा कमी असल्याचे आढळून आले असून २००० रू. व त्यापेक्षा अधिक उत्पन्न असणाऱ्या महिलांचे प्रमाण २९.८ टक्के होते. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना अंतर्गत स्वयंसहाय्यता गट निर्मिती करीत असतांना दारिद्रय रेषेखालील महिलांनाच त्यात सहभागी करून घ्यावयाचे असल्याने स्वाभाविकपणे २००० रू. पेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या महत्तम महिला वरील आलेखात निदर्शनास येत आहेत.

स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या स्वयंसहाय्यता गटात सहभागी होऊन लाभान्वित झाल्यानंतर महत्तम महिलांच्या आर्थिक स्थितीत बराच बदल झाला असून त्यांचे मासिक उत्पन्न दुपटी.तिपटीने वाढल्याचे निदर्शनास आले. एकूण ५५० उत्तरदात्यांपैकी, स्वयंसहाय्यता गटातील सहभागानंतर, २००१ ते ३००० रू. मासिक उत्पन्न असणाऱ्या ६४.२ टक्के महिला होत्या तर १.८ टक्के महिलांचे उत्पन्न ५००१ ते ६००० रू. असून हे येथील लघुत्तम प्रमाण होते. त्याचप्रमाणे, ३०.२ टक्के महिलांचे मासिक उत्पन्न ३००० ते ४००० रू. असून ४००० ते ५००० रू. मासिक उत्पन्न असणाऱ्या ३.८ टक्के महिला होत्या. स्वयंसहाय्यता गटात सहभागानंतर महत्तम महिलांच्या मासिक उत्पन्नात वाढ होऊन त्यांचे उत्पन्न २००१ ते ३००० रू. झाल्याचे दिसून आले. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत लाभान्वित झाल्यानंतर प्रती स्वरोजगारी २००० रू. मासिक उत्पन्न अपेक्षीत होते. योजनेचे हे ध्येय येथे पूर्ण झाले असून स्वयंसहाय्यता गटात सहभागी असलेल्या सर्व उत्तरदात्यांचे उत्पन्न २००० रू. वर झाल्याचे दिसून आले.

स्वयंसहाय्यता गटात सहभागापूर्वीचे महिलांचे मासिक उत्पन्न व सहभागानंतरचे मासिक उत्पन्न यात कमालीचे परिवर्तन झाले असून गटात सहभागी होण्यापूर्वी, ज्या ७०.२ टक्के महिलांचे उत्पन्न १००१ ते २००० रू. होते, त्यातील ६४.२ टक्के महिलांचे गटात सहभागानंतरचे उत्पन्न २००१ ते ३००० रू. झाले. तर, त्यातील उर्वरीत ६ टक्के महिला आणि ज्यांचे उत्पन्न २००१ ते ३००० रू. होते, अशा २४ टक्के महिलांचे गटात सहभागानंतरचे उत्पन्न ३००० ते ४००० रू. झाले असून या उत्पन्न गटातील एकुण महिला ३०.२ टक्के असल्याचे दिसून आले. गटात सहभागापूर्वी ज्यांचे उत्पन्न ३००१ ते ४००० रू. होते अशा ५.८ टक्के महिलांच्या उत्पन्नात वाढ झाली असून त्यातील ३.८ टक्के महिलांचे उत्पन्न ४००० ते ५००० व उर्वरीत महिलांपैकी १.८ टक्के महिलांचे उत्पन्न ५००१ ते ६००० रू. झाले असल्याचे दिसून आले.

### *निष्कर्ष व सूचना :*

स्वयंसहाय्यता गटात सहभागापूर्वी ७४.७ टक्के महिलांना महिन्यातून अर्धे दिवसच रोजगार उपलब्ध होत होता.

स्वयंसहाय्यता गटात सहभागानंतर त्यात वाढ होऊन ६४.६ टक्के महिलांना पंधरा दिवसापेक्षा अधिक रोजगार उपलब्ध होऊ लागल्याचे व त्यातील ४१ टक्के महिलांना २० ते २४ दिवस रोजगार उपलब्ध झाल्याचे दिसून आले. स्वयंसहाय्यता गटात सहभागापूर्वी असलेल्या महिलांच्या रोजगाराच्या स्थितीत कमालीचे परिवर्तन झाले असून अधिकतम महिलांच्या रोजगारात जवळपास दुप्पट वाढ झाल्याचे स्पष्ट होते. स्वयंसहाय्यता गटातील अंतर्गत कर्जव्यवहारातून उभे झालेले महिलांचे वैयक्तिक व्यवसाय व स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत लाभान्वित झाल्यानंतर स्वयंसहाय्यता गटाच्या महिलांनी कार्यान्वित केलेल्या समूह व्यवसायामुळे महिलांच्या रोजगारात वाढ झाल्याचे दिसून येते. असे असले तरी, गटाच्या प्रत्येक महिलेला महिन्याचे संपूर्ण ३० दिवस रोजगार उपलब्ध व्हावा, अशाप्रकारे समूह व्यवसायाची उभारणी व्हावी यासाठी प्रोत्साहक संस्थेसह जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा आणि इतर पूरक भूमिका पार पाडणाऱ्या यंत्रणानी स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत सूचित करण्यात आलेल्या बसनेजमत ।चचतवंबी व ज्ञमल ।बजपअपजपमे वर अधिक भर देण्याची गरज आहे. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत स्थापन आणि लाभान्वित करण्यात आलेल्या स्वयंसहाय्यता गटातील महिलांच्या मासिक उत्पन्नात अपेक्षीत व समाधानकारक वाढ झाली असून मासिक उत्पन्नाची बाबतीत असलेला योजनेचा उद्देश येथे यशस्वी झाल्याचे निदर्शनास आले. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत लाभान्वित स्वयंसहाय्यता गटातील ६०.२ टक्के महिलांच्या उत्पन्नात दुप्पट वाढ असून ६.८ टक्के महिलांच्या उत्पन्नात तिप्पट वाढ झाल्याचे दिसून आले. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना ही दारिद्रय निर्मूलनाची योजना, स्वयंसहाय्यता गट केंद्रीभूत घटक मानून त्या माध्यमातून राबविल्यानेच, स्वयंसहाय्यता गटास दिलेले खेळते भांडवल, महिलांनी अंतर्गत कर्जव्यवहारातून कार्यान्वित केलेले आर्थिक उपक्रम आणि स्वयंसहाय्यता गटाचे समूह व्यवसाय, यामुळे महिलांच्या उत्पन्नात अपेक्षीत वाढ झाली असून, हे योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीचे, महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचे आणि योजनेच्या यशस्वीतेचे अत्यंत महत्वाचे निर्देशक आहे.

### *संदर्भ सूची :*

१.यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, (२००४) महिलांचे सबलीकरण दारिद्रय निर्मूलन व स्वयं.सहाय्य गट, पुस्तक पहिले, नाशिकः यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

२.Amudha, N., (2013) A Study on Women Empowerment through Self Help Groups in Salem District, Thesis submitted to Mother Teresa Women's University, May 2013.

३.Basu, J.P, (2006) Microfinance and Women Empowerment: An Empirical Study with special reference to West Bengal.
http://www.igidr.ac.in/newspdf/money/mfc_10/Jyotish%20Prakash%20Basu_submission_55.pdf

४.Begam, A.M., (2011) A Study on Economic Empowerment of SHG Women through Micro Enterprises in Thanjavur District, Tamail Nadu- South India, Thesis submitted to Bharathidasan University, Thanjavur, August, 2011.

५.Doss, A.R., (2011) A Study on the Women Empowerment through Self-Help Groups (SHGs) in Chennai District, Tamil Nadu, Thesis submitted to Bharathidasan University, Tiruchirappalli, May, 2011.

६.EDA & APMAS, (2006) Self Help Groups in India: A Study of the lights and shades, EDA Ruaral Systems Pvt. Ltd. In association with APMAS (Andhra Pradesh Mahila Abhivruddhi Society) for CRS, USAID, CARE, GTZ/NABARD, 2006.

७.Loomba, Shuchi, (2013) Role of Microfinance in Women Empowerment in India, Jaipuria.edu.in/pgdm/wp-content/uploads/2013/07/Role-of-microfinance-on-women-empowerment-in-india-pdf.

८.Perumal, V.M.S., (2005) SHGs: Empowering Women at the Grassroots, Social Welfare, 52(4), 2005.

९.Prakash, M., (2011) A Study of Woem Empowerment through Self Help Group's Activities in Salem District, Tamil Nadu, Thesis submitted to Periyar University, Salem, November, 2011.

१०.Rathidevi, R., (2009) A Study on Women Empowerment through the Management of Self-Help Groups with reference to Dharamapuri District, Thesis submitted to the Periyar University, Salem, September, 2009.

११.Reji, (2013) Economic Empowerment of Women Through Self Help Groups in Ierala, International Journal of Marketing, Financial Services & Management Research, Vol. 2, No. 3, March, 2013.

१२.Shanmugam, N.K., (2007) A Study on Empowerment of Women through Women Self-Help Groups (With special reference to Namakkal District, State of Tamilnadu, India), Thesis submitted to the Periyar University, Salem, Dec. 2007.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org